शैक्षणिक संदर्भ अंक १५० (ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२४)

# साखरशाळा

लेखक : ज्ञानदा गद्रे-फडके



# साखरशाळा

## लेखक : ज्ञानदा गद्रे-फडके

**इचलकरंजी परिसरात ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी हंगामी साखर शाळा सुरू करणारी पहिली व्यक्ती म्हणजे माझे बाबा. यंत्रमाग आणि शेती या आपल्या व्यवसायांमध्ये रमलेल्या बाबांनी अचानक अशा शाळा का सुरू केल्या? हा सगळा प्रवास खूप मोठा आहे!**

### पहिली बालवाडी

माझी आई इचलकरंजीच्या गंगामाई बालक मंदिर शाळेमध्ये बालवाडी शिक्षिका म्हणून अनेक वर्षे काम करत होती. ही शाळा नामांकित असल्यामुळे प्रवेशाचे फॉर्म वाटण्याच्या आदल्या दिवशी रात्रीपासून फॉर्म घेण्यासाठी पालकांच्या रांगा लागत असत!

इचलकरंजीजवळचे एक खेडे अब्दुल लाट येथे आमची शेती असल्यामुळे बाबा आठवड्यातून दोन-तीन दिवस तिकडे जात असत. ‘इचलकरंजीत बालवाडी प्रवेशासाठी एवढी झुंबड उडते, मग आपल्या शेताजवळची मुले कुठल्या शाळेत जातात?’, असा प्रश्न त्यांच्या मनात आला. आमचे  शेत लाट गावाच्या पुढे लक्ष्मीनगर नावाच्या वसाहतीजवळ होते. वसाहत म्हणजे सगळीकडे शेती आणि प्रत्येक शेतकऱ्याचे शेतातच घर, असा हा भाग. या भागातील थोडी मोठी मुले बसने लाटेच्या शाळेत जात. पण बालवाडीच्या वयातल्या

मुलांना नेण्या-आणण्यासाठी घरच्या माणसांना शेतीच्या कामातून वेळ मिळत नसे. त्यामुळे ती थेट पहिलीला शाळेत जात असत.

आई बालवाडी शिक्षिका असल्यामुळे बालवाडीतील साधने, या वयातील मुलांच्या विकासासाठी त्यांचा असलेला उपयोग, शिक्षणासाठी महत्त्वाचा असलेला तीन ते पाच वर्षांचा वयोगट; वगैरेची चर्चा आमच्याकडे होत असे. शेताजवळच्या वस्तीत सर्वेक्षण केल्यावर या वयातील २०-२५ मुले आढळली. त्यामुळे आईच्या अनुभवाचा उपयोग करून आपल्या शेताजवळ मुलांसाठी एखादी बालवाडी काढता येईल का? असा विचार बाबांनी केला. आईनेही मार्गदर्शनाची तयारी दाखवल्यामुळे लक्ष्मी मंदिरात शाळा सुरू झाली. या वस्तीतीलच एका महिलेला शिक्षिका म्हणून काम करण्यासाठी आईने तयार केले होते. हे साधारण १९९४ साल असेल. आईची शनिवारी सकाळची शाळा झाल्यावर आई-बाबा लाटेला जात. मग आई या शाळेतील विद्यार्थ्यांना आणि नंतर शिक्षिकांना मार्गदर्शन करत असे. या शाळेला मुलांचा आणि पालकांचा चांगला प्रतिसाद लाभला. ही शाळा व्यवस्थित सुरू झाली. मुलांची सर्व फी शिक्षिकेला पगार म्हणून देण्यात येत होती. शिवाय खाऊ, खेळणी वगैरे सोय आई-बाबांनी केली होती. ही बालवाडी २ वर्षे चालल्यावर मुलांच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. स्थानिक लोक प्रतिनिधींच्या मदतीने, जिल्हा परिषदेची शाळा सुरू करण्याचे ठरले. शाळेसाठी जागेचा प्रश्न उभा राहिल्यावर, लोकवर्गणीतून आणि बाबांनी काही पैसे घालून जागा विकत घेऊन जिल्हा परिषदेला दिली. आजही ही शाळा सुरू आहे. या शाळेतील काही माजी विद्यार्थी आता शिक्षक, शिक्षिका आणि पोलीससुद्धा झाले आहेत.

**गबाळ शाळा - ऊस शाळा ते साखर शाळा**

आमच्या कोल्हापूर भागातले मुख्य पीक ऊसाचे असल्यामुळे ऊस तोडणीच्या हंगामात बीड जिल्हयातून आणि कर्नाटकच्या काही भागातून ऊस तोडणी कामगारांची कुटुंबे







*ऊस तोडणी कामगारांची पाले*

या भागात स्थलांतरित होतात. कामगारांबरोबर त्यांची लहान मुलेही येतात. आई-वडील ऊस तोडणीला गेले म्हणजे ही मुले आपल्या लहान भावंडांना सांभाळत दिवसभर त्यांच्या वस्तीत असतात. हंगामी स्थलांतर होत असल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होतो. यातील काही मुले पुढे गावाकडील शाळेत जातात किंवा काही जातही नाहीत. या मुलांच्या शिक्षणाची आबाळ होत असल्यामुळे या मुलांसाठी शाळा काढली पाहिजे, असे आई बाबांच्या मनात आले. त्याप्रमाणे लाट गावात दोन स्थानिक महिलांना या शाळेत शिकवण्यासाठी तयार करून या मुलांसाठी पहिली शाळा सुरू झाली. ऊस तोडणी

कामगारांच्या कामगारांची पाले पडतात, त्याला या भागात 'गबाळ' असे नाव आहे. या गबाळावर चालणारी शाळा म्हणून सुरुवातीला शाळेचे नाव 'गबाळ शाळा' असे होते.

या शाळेत शिकवणे आव्हानात्मक होते. एक तर खेडेगावात महिलांनी बाहेर पडून काही करायला असलेला विरोध, शिवाय अशा मुलांना कशाला शिकवायचे? तुम्हाला असे किती पैसे मिळणार? अशा अनेक प्रश्नांना तोंड देत शिक्षिकांनी कामाला सुरुवात केली. या मुलांना शालेय शिक्षणापूर्वी स्वच्छतेपासून सर्व गोष्टी शिकवाव्या लागतात. त्यांच्या खोपीवर जाऊन बोलावून शाळेमध्ये आणावे लागते. शिक्षकांच्या मानधनाचाही प्रश्न होता. पण इचलकरंजीतील रोटरी क्लब, लायन्स क्लब यांसारख्या संस्थांच्या मदतीने आणि आई-बाबांचे मित्रमंडळी, नातेवाईक यांच्या देणग्यांमधून आणि अर्थातच प्रसंगी पदरमोड करून शिक्षिकांचा पगार सुरू झाला, मुलांच्या खाऊची सोयही झाली.

याच दरम्यान बाबांना कोणीतरी सांगितले की पुण्याची 'ज्ञान प्रबोधिनी संस्था' अशा साखर शाळा बऱ्याच वर्षांपासून चालवत आहे. तेव्हा पुण्याला जाऊन ज्ञान प्रबोधिनीमध्ये संपर्क साधून बाबांनी मांजरीमधल्या साखर शाळांना भेट दिली आणि त्या कशा चालवल्या जातात, हे समजून घेतले. लाटेच्या शाळा दिवसातून दोन-तीन तास चालत असत. प्रबोधिनीच्या शाळा जास्त वेळ चालत असत. जास्त वेळ शाळा चालवायच्या तर पुन्हा शिक्षकांच्या वाढीव मानधनाचा प्रश्न होता. याबाबत प्रबोधिनीने केलेल्या साहाय्यामुळे हा प्रश्न सुटल्यानंतर शाळा जास्त वेळ भरू लागल्या.

हळूहळू लाटेबरोबच आसपासच्या इचलकरंजी, दत्तवाड, हेरवाड, घोसरवाड, टाकवडे, शिरढोण अशा एकूण बारा गावांमध्येही शाळा सुरू झाल्या. सर्व गावांमधल्या

स्थानिक संपर्कातून शिक्षिकांची नेमणूक केली जात होती. फार मोठे मानधन मिळत नसतानाही स्वयंसेवी वृत्तीने सर्व शिक्षिकांनी अतिशय उत्तम काम केले. वयोगटानुसार दिल्या जात असलेल्या शालेय शिक्षणाबरोबरच मुलांचे विविध खेळ, गाणी, गोष्टी घेऊन, मुलांना आनंददायी वाटेल अशा प्रकारचा इथला अभ्यासक्रम असे. या मुलांच्या सहलीसुद्धा काढल्या जात. इचलकरंजीतील भगतसिंग सिंह बागेत दरवर्षी सहल काढली जात असे. या सहलीला स्थानिक रिक्षावालेसुद्धा अतिशय उत्साहाने मदत करत.

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण अभ्यासक्र**

शाळांची संख्या वाढली पण प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता होती. आईने शिवाजी विद्यापीठाचा बालवाडी कोर्स पूर्ण केला होता. त्यात ती विद्यापीठात दुसरी आली होती. त्यामुळे ज्या नाईट कॉलेजमध्ये तिने हा कोर्स पूर्ण केला, त्यांनी लगेचच दुसऱ्या वर्षापासून तिला या कोर्समध्ये काही विषय शिकवण्यासाठी आमंत्रित केले होते. त्याप्रमाणे काही वर्षे तिने या कोर्समध्ये विविध विषयांचे अध्यापन केले होते. हा कोर्स उपयुक्त असल्यामुळे, थेअरी आणि प्रॅक्टिकल यांचा त्यात चांगला बॅलन्स असल्यामुळे, आपण हाच कोर्स का घेऊ नये? असा विचार पुढे आला. त्यानुसार शिरदवाड या मध्यवर्ती गावात बालवाडी कोर्स सुरू करण्याचे ठरवले. अपेक्षेपेक्षा खूप जास्त प्रतिसाद मिळून एका तुकडीऐवजी दोन तुकड्या कराव्या लागल्या.

आईच्या अनेक सहकारी शिक्षिकांनी या कोर्समध्ये अध्यापन केले. यातून प्रशिक्षित झालेल्या सर्व शिक्षिका आणि साखर शाळांमध्ये शिकवणाऱ्या सर्व शिक्षिकाही आज विविध अंगणवाड्यांमध्ये, बालवाड्यांमध्ये आणि काही मोठ्या शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत

आहेत. यातील काही शिक्षिकांनी मी मागच्या लेखात म्हटल्याप्रमाणे मुक्त विद्यापीठातून पदवीसुद्धा घेतली. महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या कर्नाटकातील काही गावांमध्ये मराठी शाळा आहेत, पण मराठी बालवाडी नाही अशी परिस्थिती होती. तेथील लोकांच्या मागणीवरून बेडकीहाळ, चांद शिरदवाड या गावांमध्ये मराठी बालवाड्या सुरू करण्यात आल्या.

या सर्व उपक्रमांसाठी आईबाबांनी ‘अनुतारा बाल शिक्षण प्रसारक मंडळ’ या संस्थेची स्थापना केली. प्रख्यात बालशिक्षण तज्ज्ञ अनुताई वाघ आणि ताराबाई मोडक यांच्यावरून हे नाव देण्यात आले होते. अनुताईंचे आशीर्वाद घ्यायला आई बाबांबरोबर कोसबाडला गेल्याचे मला आठवते आहे.

‘मुले जर शाळेत जात नसतील तर शाळेने मुलांकडे गेले पाहिजे’ या ताराबाई मोडक यांच्या वाक्याला अनुसरूनच साखर शाळांचे काम चालू होते. ‘गबाळ शाळा’ - ‘ऊस शाळा’ अशी या शाळांची नामकरणे होत ज्ञानप्रबोधिनीशी संपर्कानंतर सगळ्या शाळांचे नाव ‘साखर शाळा’ असे झाले.

अशा अनेक वर्षे शाळा चालल्यावर ‘महात्मा फुले शिक्षण हमी योजना’, ‘हंगामी साखर शाळा योजना’ अशा सरकारी योजना आल्या. आता शिक्षकांना पुरेसे मानधन मिळेल, त्यांनी केलेल्या कष्टांचे चीज होईल आणि अजून अनेक शाळा सुरू करता येतील, असे वाटत होते. मानधनाचा पहिला चेक आणायला गेल्यावरच बाबांना प्रथेप्रमाणे टक्के मागितले जाण्याचा अनुभव आला, पैसे अडवून ठेवण्याचा कटू अनुभवही आला आणि अतिशय वाईट वाटले!

**ज्ञान प्रबोधिनी, पुणे यांचे उपक्रम**

ज्ञान प्रबोधिनीशी संपर्क झाल्यावर, सर्वांत प्रथम साखर शाळा शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आमच्याकडे साखर शाळा विभागातल्या कार्यकर्त्या गीतांजलीताई देगावकर आणि नीताताई ओसवाल आल्या. त्यानंतर 'छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीच्या मासिकाचे संपादक महेंद्रभाई सेठिया आले. इचलकरंजीमध्ये आमच्याकडे छात्र प्रबोधन मासिकाचे केंद्र सुरू झाले. बाबा ज्ञान प्रबोधिनीच्या 'कार्यकर्ता प्रशिक्षणात' सहभागी झाले. कामाला दिशा मिळाली. पंचवीस-तीस वर्षे छात्र प्रबोधनची विविध शिबिरे आणि इतर अनेक उपक्रमही पार पडले. त्याबरोबरच विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रबोधिनीचे तत्कालीन प्राचार्य मा. विवेकराव पोंक्षे सर, बागेश्रीताई पोंक्षे, डॉ. विवेक कुलकर्णी, सविताताई कुलकर्णी, 'प्रज्ञा मानस संशोधिके'च्या अनघाताई लवळेकर, संत्रिकेच्या आर्याताई जोशी, ज्ञान प्रबोधिनीचे तत्कालीन कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे, संचालक मा. गिरीशराव बापट असे अनेक पदाधिकारी आणि ज्येष्ठ कार्यकर्ते आमच्या घरी येऊन, राहून गेले. या सर्वांचा सहवास आम्हाला लाभला. त्यांच्या अनुभवांमधून, व्यक्तिमत्वांमधून खूप काही शिकायला मिळाले आणि त्यातील काहींशी घरगुती नातेही तयार झाले.

आपल्या आयुष्यात एखादी व्यक्ती येते आणि तिच्यामुळे आपले आयुष्य बदलून जाते, तसेच ज्ञान प्रबोधिनी ही संस्था बाबांच्या आयुष्यात आल्यानंतर त्यांचे आयुष्यच बदलून गेले आणि त्याबरोबर त्यांच्यामुळे आमच्या इचलकरंजी शहरात ज्ञान प्रबोधिनीच्या अनेक विभागांचे अनेक वेगवेगळे उपक्रमही राबवले गेले. 'मी ज्ञान प्रबोधिनीचा कार्यकर्ता आहे!' असे सांगताना बाबांना अभिमान वाटतो.

इचलकरंजीतूनही अनेक शिक्षक, कार्यकर्ते पुण्यात ज्ञान प्रबोधिनीच्या विविध शिक्षक प्रशिक्षण शिबिरांमध्ये, प्रबोधिनी परिचय सहलींमध्ये सहभागी झाले. काही कार्यकर्त्यांनी प्रबोधिनीच्या विभागांमध्ये काही काळ कामही केले. वयपरत्वे आई बाबांनी सर्व उपक्रमांमधील सहभाग थोडा कमी केल्यानंतर, आता पुढच्या पिढीचा कार्यकर्ता, विनायक माळी 'विद्योदय मुक्तांगण' या त्याच्या संस्थेतर्फे साखर शाळा चालवतो, तसेच इतरही अनेक शैक्षणिक उपक्रम चालवतो.



*ऊस तोड मजूरांच्या मुलांसाठी चालवलेली सेवांकुर साखर शाळा*
*स्रोत : विकिपीडिया*

'अनेक वर्षे निरंतर काम करेल अशी एखादी मोठी संस्था आपण उभारू शकलो नाही', याचे बाबांना कधीकधी वाईट वाटते. पण त्यांच्या संस्थांमध्ये काम केलेले अनेक शिक्षक शिक्षिका आणि त्यांच्याबरोबरीने काम केलेले अनेक कार्यकर्ते आता आपापल्या ठिकाणी हा वसा पुढे नेत आहेत.

बाबांची आम्ही मुले त्यांच्यासारखे कार्यकर्ते झालो नसलो तरीही, आमच्या परीने वेगवेगळ्या ठिकाणी चाललेल्या विविध चांगल्या कामांमध्ये खारीचा वाटा उचलत असतो. कशाची तरी गरज असणारे लोक आणि लोकांना मदत देण्यासाठी तयार असणारे लोक यांच्यामधला पूल होण्याचं काम आम्ही नेहमीच करत असतो. विशेषत: इचलकरंजीसारख्या कामगारबहुल वस्ती असलेल्या आणि ग्रामीण भागाशी जोडलेल्या शहरात लहानाचे मोठे

होऊन पुण्यासारख्या मोठ्या शहरात स्थायिक झाल्यावर सगळ्या गोष्टींमधील तफावत फारच जाणवते!


'स्वतःसाठी कोणाकडे काही मागत नसाल तर इतर कोणासाठी, कुठलीही मदत मागण्यात लाज कसली?' असे बाबांनी शिकवले आहे. त्यामुळे आजही साखर शाळेतल्या मुलांसाठी कपडे-खेळणी असोत, कोणा हुशार, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनीच्या शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक मदत हवी असो, आमच्या मित्र-मैत्रिणींना, नातेवाईकांना, शेजाऱ्यांना मदतीचे आवाहन करण्यासाठी आम्ही कधी लाजत नाही. आमच्या घरातील पुढची पिढीसुद्धा याच तालमीत तयार होत आहे, याचा आनंद वाटतो.

आयुष्यात एखादे ध्येय ठेवून प्रचंड मोठे काम उभे करणारी असामान्य माणसे आपण अनेकदा बघतो. त्यांच्याबद्दल आपल्याला खूप आदर वाटतो. त्याचबरोबर आपल्यासारख्या सामान्य माणसाला हे शक्य नाही, असंही वाटतं. आईबाबांच्या विविध उपक्रमांमधून मी एवढं नक्की शिकले की सामान्य माणसालाही आपल्या परीने बरेच काही करता येते. अनेक छोटे-मोठे बदल घडवता येतात, गरज आहे ती काहीतरी करण्याच्या इच्छेची, संवेदनशीलतेची आणि स्वतःच्या कुटुंबाच्या पलिकडे पाहण्याची!

हा सगळा प्रवास थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या सगळ्या गोष्टी सहज घडल्या, असं वाचताना वाटत असले, तरीही अनेक खाच-खळगे, आव्हाने होती. त्या त्या वेळी त्यावर उत्तरे काढून वाटचाल करण्यात आली. "तुम्ही हे सगळं कशासाठी करता? काय मिळतं त्यातून?" या प्रश्नाला आईबाबांनी तेव्हाही तोंड दिलं, आजही देतात! या कशातूनच

पैसे मिळत नसताना ही कामे कोणी स्वत:च्या आनंदासाठी करत असेल, यावर अनेकांचा विश्वास बसत नाही.

कुठेही अर्ज न करता, कामाच्या फाईल्स तयार न करून ठेवता, आईबाबांना अनेक पुरस्कार मिळाले. सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांनी ते स्वीकारले. आजही एखाद्या मुलाखतीसाठी, पुरस्कारासाठी कुणी बायोडेटा मागितला तर त्यांच्याकडे लिहिलेलं काहीही तयार नसतं!



*शेठ चिमणलाल गोविंददास मेमोरियल ट्रस्ट, पुणे यांचा सेवा गौरव पुरस्कार, श्री. प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते स्वीकारताना*

अर्थात, मी आई-बाबा म्हटले तरी त्यांच्याबरोबरीने नेहमीच कार्यकर्त्यांचा मोठा गट होता. त्या सगळ्यांचे योगदान अनमोल आहे.

§§§

---

**लेखक : ज्ञानदा गद्रे-फडके,** मुक्त भाषांतरकार आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण विषयक अनुवादात विशेष स्वारस्य.

**इमेल :** dnyanadaphadke@gmail.com

*(कळीचे शब्द :- गबाळ, गबाळ शाळा, ऊस शाळा, साखर शाळा, ऊस तोडणी कामगार, अनुतारा बाल शिक्षण प्रसारक मंडळ)*